**महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) संघटनांनी शासनाची मान्यता मिळण्याकरिता संबंधित प्रशासकीय विभागामार्फत प्रस्ताव सादर करताना अनुसरावयाची कार्यपध्दती...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :** संघटना १५१४/प्र.क्र. २५० /१६-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ मार्च, २०१५.

<u>वाचा</u> :- महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २९ व नियम ३० व सदर नियमांखाली विहित परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन.

<u>प्रस्तावना</u> :-

शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते.

२. राज्य शासकीय (औद्योगिकेतर) कर्मचारी व्यतिरिक्त अन्य निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी ज्यांना औद्योगिकेतर कर्मचारी समजण्यात येत नाहीत अशा कर्मचा-यांच्या तसेच रोजंदारी तत्वावर कार्यरत असलेल्या किंवा स्वायत्त संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संघटनांना उपरोक्त नियमांखाली मान्यता अनुज्ञेय नाही.

३. शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) संघटनांना मान्यता देण्याची बाब जरी सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील असली तरीदेखील नियोजित संघटनेने असा प्रस्ताव थेट सामान्य प्रशासन विभागाकडे सादर न करता तो आपल्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे प्रथम सादर करणे आवश्यक आहे.

४. अशा नियोजित संघटनेने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियमावलीतील नियम क्र.२९ व ३० तसेच त्याखालील परिशिष्टामध्ये विहित अटी व शर्ती तसेच अनुसूची एक मध्ये विहित अर्जाचा नमूना व अनुसूची दोन मध्ये विहित "नवीन आदर्श नियम" मधील घटना व नियमानुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे शासन मान्यता इच्छुक असलेल्या नियोजित संघटनेनी या सर्व बाबींचे पालन करुन योग्यरित्या प्रस्ताव सादर केला आहे किंवा कसे, त्याचप्रमाणे सदर संघटनेचे नियोजित सभासद हे एकाच संवर्गाचे म्हणजे गट-"ड" चे कर्मचारी किंवा गट-"क" व गट-"ब" (अराजपत्रित) चे कर्मचारी किंवा गट-"ब" चे व गट- "अ" चे राजपत्रित अधिकारी आहेत व नियोजित संघटनेने आपल्या प्रस्तावासोबत सादर केलेल्या सभासदांच्या यादीमध्ये नमूद कर्मचारी नियोजित संघटनेचे सभासद होण्यास खरोखरच इच्छुक आहेत व ते सभासद यादीत त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या कार्यालयात व त्या पदावर कार्यरत आहेत तसेच संघटना नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या एकूण कर्मचारी संख्येच्या २५% एवढ्या

सभासद संख्येबाबतची अट नियोजित संघटना पूर्ण करीत आहे किंवा कसे ही बाब तपासणे व ते प्रमाणित करणे किंवा त्याची खातरजमा संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडून करुन घेणे ही बाब त्या क्षेत्रिय कार्यालयाच्या संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून होणे अपेक्षित आहे.

५. अन्य विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखाली असलेल्या क्षेत्रिय कार्यालयाकडून वा स्वायत्त संस्था, मंडळे, महामंडळे, इत्यादी कार्यालयाकडून याबाबतची अचूक व सत्वर माहिती या विभागास थेट उपलब्ध होणे जिकिरीचे असून प्रशासकीयदृष्ट्या ते उचित दिसून येत नाही.

६. त्याचप्रमाणे ज्या क्षेत्रिय कार्यालयातील/स्वायत्त संस्थेमधील कर्मचारी एकत्र येऊन संघटना स्थापन करु इच्छितात त्यांनी शासनाच्या ज्या प्रचलित तरतूदी वा नियमांखाली असा प्रस्ताव सादर केला आहे त्यानुसार त्यांना अशी मान्यता अनुज्ञेय आहे किंवा कसे ही बाब संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने त्यांच्या स्तरावर तपासून आपल्या विभागाच्या संबंधित मा.मंत्री महोदयांच्या ते निदर्शनास आणणे व त्यांची (शासनाची) मान्यता घेणे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

७. या सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ खाली ज्या कर्मचा-यांच्या संघटनांना शासनाची मान्यता अनुज्ञेय आहे अशा संघटनांकडून शासनाकडे प्राप्त होणा-या प्रस्तावासंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने आता खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

शासकीय कर्मचारी (औद्योगिकेतर) यांच्या नियोजित संघटनेस (ज्यांचा यापुढे “नियोजित संघटना” असा उल्लेख केला आहे) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे नियम २९ व ३० तसेच सदर नियमांखाली विहित परिशिष्टातील शर्ती, अनुसूची एक मध्ये विहित अर्जाच्या नमुन्यात तसेच अनुसूची दोन मधील “नवीन आदर्श नियम” यामध्ये विहित घटना व नियम यांच्या तरतूदींच्या अधीन राहून शासनाची मान्यता अनुज्ञेय आहे.

२. त्यामुळे अशा नियोजित संघटनेने शासन मान्यतेसाठी आपले कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख यांचे मार्फत विभागाकडे याबाबतचा प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव केला आहे याची कटाक्षाने दक्षता घेणे आवश्यक राहील-

१. नियोजित संघटनेने अनुसूची एक मध्ये विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

२. सदर अर्जासोबत सभासदांची यादी तसेच ते सध्या शासनाच्या कोणत्या विभागात/ कार्यालयात व कोणत्या पदावर कार्यरत आहेत याचा तपशील दयावा.

३. त्याचप्रमाणे ते सर्व कर्मचारी नियोजित संघटनेचे सभासद होऊ इच्छित आहेत याबाबत खातरजमा केली असल्याचे ते ज्या विभागात/कार्यालयात सध्या कार्यरत आहेत त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.

४. नियोजित संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकारिणी सभासदांची यादी, त्यांच्या कार्यालयाचा पत्ता, पदनाम, इत्यादी तपशील दयावा.

५. नियोजित संघटनेने आपल्या प्रस्तावासोबत अनुसूची दोन येथे “नवीन आदर्श नियम” यामध्ये विहित घटना व नियम सादर करावेत.

६. नियोजित संघटनेस मान्यतेबाबतचा प्रस्ताव सादर करताना विहित घटना व नियम यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

७. नियोजित संघटनेचे सभासद हे शासकीय कर्मचारी (औद्योगिकेतर) आहेत व ते एकाच वर्गाचे आहेत, या बाबतचे संबंधित कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत दयावे.

८. नियोजित संघटनेने प्रस्तावासोबत रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर खालील प्रमाणे शपथ पत्र सादर करणे आवश्यक राहील-

अ) ज्या वर्गाचे प्रतिनिधीत्व संघटना करते त्या वर्गातील शासकीय कर्मचा-यांच्या एकूण संख्येपैकी २५ टक्के कर्मचारी या संघटनेचे सदस्य आहेत.

ब) ही संघटना कोणत्याही प्रकारे राजकीय पक्षाशी किंवा संघटनेशी संबंधित नाही किंवा राजकीय चळवळीमध्ये गुंतलेली नाही.

क) सदस्यांच्या वतीने कोणतेही प्रचारात्मक किंवा प्रक्षोभक साहित्य, वृत्तपत्रातून किंवा अन्यथा प्रकाशित करणार नाही किंवा प्रकाशित करण्यास अनुमती देणार नाही.

ड) या संघटनेने ..................................................या नावाने मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला आहे. या संघटनेस यापूर्वी मान्यता दिलेली नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावातील संघटना ही राज्यातील या संवर्गाची एकमेव संघटना आहे.

३. नियोजित संघटनेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग यांनी करावयाची कार्यवाही-

एक) नियोजित संघटनेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विहित नमुन्यात आहे व उपरोक्त परि.२ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पूर्णत: पालन करणारा आहे याची प्रथम खातरजमा करावी.

दोन) नियोजित संघटनेच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्यास किंवा याबाबत विहित नमुना, घटना व नियम यामध्ये नियोजित संघटनेने बदल केला असेल तर तशा त्रुटींबाबत नियोजित संघटनेस कळवून असा प्रस्ताव आपल्या स्तरावरुनच अमान्य करावा.

तीन) नियोजित संघटनेकडून प्राप्त प्रस्तावाची संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून छाननी करुन (टंकलेखनी चुका/त्रुटी, इत्यादी दुरुस्ती करुन) तद्नंतर नियोजित संघटनेचा प्रस्ताव नियमानुकूल असल्याची व त्यास शासनाची मान्यता अनुज्ञेय असल्याची मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची खात्री झाल्यास, विभागाच्या तशा स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आपल्या विभागाच्या मा.मंत्री महोदयांच्या (जे विभाग मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अखत्यारीत असतील त्या विभागाच्या संदर्भात त्यांचे मा.राज्यमंत्री महोदयांच्या) मान्यतेने नियोजित संघटनेचा प्रस्ताव या विभागाकडे हस्तांतरीत करावा.

४. असा स्वयंस्पष्ट व संपूर्ण प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर नियोजित संघटनेस शासनाची मान्यता देण्याबाबत नियमानुसार आवश्यक पुढील कार्यवाही या विभागामार्फत करण्यांत येईल.

५. हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकास शासनाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे किंवा क्षेत्रिय कार्यालयाकडे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियमाखाली शासन मान्यता मिळण्याकरिता नियोजित संघटनेकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांबाबत देखील या परिपत्रकातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१५०३१८१२०५४३४६०७ आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2015.03.23 16:08:33 +05'30'

**(टि.वा.करपते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
२. सर्व सन्माननीय विधान परिषद/ विधान सभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधानभवन, मुंबई-३२.

९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधानभवन, मुंबई-३२.
१०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
११.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१२.प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१७.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
१८.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती).

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रकास प्रसिध्दी देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.**

२०.सर्व मंत्रालयीन विभाग.
२१.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
२२.मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख.

**(त्यांनी सदर परिपत्रक आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दी करिता लावावे)**

२३.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/ नगरपरिषदा.
२५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२६.विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती).
२७.राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२८.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये.
२९.निवड नस्ती/कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (१५ प्रती).

***************